# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. बीएम ३४६/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. जितेंद्र रामबडाई गुप्ता**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/निष्का)**
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बोरिवली-१ यांचे कार्यालय,
तळमजला, रुस्तमजी कॉम्प्लेक्स, महानगरपालिका मंडई हॉल,
जे.एस.मार्ग, दहिसर (पश्चिम) मुंबई -४०० ०६८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (अति/निष्का)**
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बोरिवली-१ यांचे कार्यालय,
तळमजला, रुस्तमजी कॉम्प्लेक्स, महानगरपालिका मंडई हॉल,
जे.एस.मार्ग, दहिसर (पश्चिम) मुंबई -४०० ०६८

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१०.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

MHSICMU/२०१८/M/००४९३६ प्रकरणी आयोगाने
आयोगाने यापूर्वी अपील क्र.
आदेश पारित केले आहेत :-
दि.२८.०१.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-
"जन माहिती अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी दि. १८.०२.२०१९ पर्यंत या *प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती, अपिलार्थींना विनामुल्य द्यावी. या आदेशासह अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. ०७.०३.२०१८ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/निष्का) बोरीवली- १, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बोरीवली यांचे कार्यालय, दहिसर (प), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. १८.०९.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/निष्का) बोरीवली यांनी त्यांचा अहवाल दि. ०५.१०.२०१९ आयोगास सादर केला. जन माहिती अधिकारी यांनी अहवालात नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने अपिलार्थींना दि. १८.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये नस्तीची पडताळणी करुन आवश्यक माहिती सांगितल्यास छायांकित प्रती काढणेसाठी लेखाशाखेकडे निधीची मागणी करता येईल व निधी उपलब्ध होताच माहिती देता येईल असे तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी कळविले होते. तसेच सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी देखील दि. १८.०२.२०१९ चे पत्राचे अनुषंगाने आपणास अपेक्षित माहितीसाठी रक्कम रुपये ५९९०/- एवढा खर्च होत असून लेखा शाखेला निधीची मागणी करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, त्यांच्याकडे निधी उपलब्ध नसल्याने तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच, जन माहिती अधिकारी संबंधीत नस्ती आता कोणत्या कार्यालयाकडे आहे याबाबत काहीही सांगु शकले नाही.

जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगास निवेदन केले की, प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांचे आदेशानंतर कोषागारातून निधी उपलब्ध होण्यास विलंब होत असल्याने अपिलार्थींनी छायांकित प्रती काढण्यासाठी होणारा खर्च करणेस तयारी दर्शवली व स्वत: खर्च करुन दि. २०.१०.२०१८ रोजी माहिती प्राप्त करुन घेतली.

जन माहिती अधिकारी यांनी सदर नस्ती आता कोणत्या कार्यालयाकडे आहे याबाबतचे लेखी निवेदन, तसेच दि. २८.०१.२०१९ ते आजपर्यंत जन माहिती अधिकारी कोण होते यांची यादीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. अपिलार्थींनी स्पष्ट करावे की, त्यांनी दि. २०.१०.२०१८ रोजी प्राप्त करुन घेतलेली माहिती व्यतिरिक्त आता कोणती माहिती त्यांना अपेक्षित आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २३.१०.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०४.१०.२०२४**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३४६/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. जितेंद्र रा. गुप्ता**

**सुनावणी दिनांक : २३.१०.२०२४ (In continuation of order dt ०४.१०.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १८.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित ---"---- |

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक २०.१०.२०२४ चे लेखी निवेदनद्वारे विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीसाठी त्यांची नियुक्ती करण्यात आलेली असल्याने ते दिनांक २३.१०.२०२४ च्या सुनावणीस उपस्थित राहू शकणार नाहीत, असे सादर करून पुढील तारीख मतमोजणीनंतर ठेवण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०५.१२.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : २८.१०.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३४६/२०१९
## अपिलार्थीश्री. जितेंद्र रा. गुप्ता
## सुनावणी दिनांक : २३.१२.२०२४ (In continuation of order dt २८.१०.२०२४)

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २६.११.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २६.११.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांची विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आल्यामुळे त्यांनी वेळेची मागणी केली होती. त्यांची मागणी मान्य करण्यात आली होती.

आजच्या सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही सुचना न देता अनुपस्थित आहेत.

कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहेत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलाशासह व त्यांचेवर प्रत्येकी १०,०००/- दंड का लावण्यात येऊ नये याच्या खुलाशासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

### आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.०१.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

27-12-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २७.१२.२०२४**

**रामाआ-तक्रार क्र.बीएम- ३४६/२०१९**

**तक्रारकर्ता - श्री. जितेंद्र गुप्ता**

**सुनावणी दिनांक : २७.०१.२०२५ (Continuations Order 23.12.2024)**

या प्रकरणात आयोगाने दि. २३.१२.२०२४ रोजी पुढीलप्रमाणे निर्देश दिले होते :-

"आजच्या सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत.

कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहेत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलाशासह व त्यांचेवर प्रत्येकी रु.१०,०००/- दंड का लावण्यात येऊ नये याच्या खुलाशासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.२७.०१.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल."

२. उपरोक्त निर्देशास अनुसरुन दि.२७.०१.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. सदर सुनावणीस तक्रारकर्ता हे उपस्थित असून संबंधित तत्कालीन / विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे दोन्ही पक्षकार अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी असे विषद केले की, आयोगाने त्यांच्या द्वितीय अपीलाच्या अनुषंगाने दि.२८.०१.२०१९ च्या आदेशान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे अद्यापपर्यंत त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

तथापि, द्वितीय अपीलाच्या अनुषंगाने दि.२८.०१.२०१९ अन्वये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत श्रीमती एन.व्ही.गोपांळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी दि.०५.१०.२०१९ च्या पत्रान्वये व श्री. हनुमंत जगताप, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी दि.०५.१०.२०१९ च्या पत्रान्वये तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल सादर केला आहे. त्यात त्यांनी असे नमूद केले आहे की,

"या प्रकरणी अपिलार्थी यांनी आपणाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाच्या अनुषंगाने दि.२८.०१.२०१९ रोजी सुनावणी होऊन अपिलार्थीस प्रकरणात उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य देणेबाबत आदेशित केले. तसेच छायाप्रती देण्यासाठी कार्यालयीन अडचणीबद्दल वरिष्ठांकडून बजेट तरतूद करवून अपेक्षित छायाप्रत देणे आवश्यक ठरते असे आदेशात नमूद केले आहे.

सदर आदेशाची अनुषंगाने अपिलार्थीस दि.१८.०२.२०१९ रोजीचे पत्रान्वये नस्तीची पडताळणी करुन आवश्यक माहिती सांगितल्यास छायांकित प्रती काढणेसाठी लेखाशाखेकडे निधीची मागणी करता येईल व निधी उपलब्ध होताच माहिती देता येईल असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कळविले होते.

तसेच सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी देखिल दि.१८.०२.२०१९ चे पत्राचे अनुषंगाने आपणांस अपेक्षित माहितीसाठी रक्कम रु.५,९९०/- ऐवढा खर्च होत असून लेखा शाखेला निधीची मागणी करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

अपिलार्थी यांना माहिती पुरविणेकामी कोणतीही टाळाटाळ केलेली नाही. तरी दि.२८.०१.२०१९ रोजी केलेला खुलासा व उपरोक्त नमूद खुलासा मान्य करुन जन माहिती अधिकारी यांचेवर कोणतीही शास्ती लागू नये ही विनंती."

..२/-

तसेच, श्री. हनुमंत जगताप, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी दि.२३.१२.२०२० च्या पत्रान्वये वरील नमूद दि.०५.१०.२०१९ च्या पत्रातील मुद्दांचा / बाबींचा पुर्नउल्लेख करुन असे नमूद केले आहे की,

"वरील नमूद पृष्ठांच्या छायांकित प्रतीसाठी आजतागायत कोणताही निधी या कार्यासनात लेखा शाखेकडून प्राप्त झाला नाही.

परंतु, महादेय वरिष्ठांच्या आदेशानुसार वर नमूद केल्याप्रमाणे पृष्ठांच्या प्रती करणेकामी संबंधित कार्यासनाला सूचना देणेत आले असून त्याबाबत अर्जदार यांना छायांकित प्रती देऊन त्याबाबतचे देयक लेखा शाखेला देणेची सूचना देणेत आली आहे व त्याबाबत पत्र अर्जदार यांना दि.२२.१२.२०२० रोजी देणेत आले आहे.

महादेय, या कार्यालयाकडे दरमहा साधारणत: ५० ते ६० माहितीचे अधिकार अर्ज प्राप्त होत असतात, माहिती अधिकार कायद्यानुसार प्रतिपान रु.२/- याप्रमाणे अर्जदार शासकीय शुल्क भरणा करतात.

परंतु, माहिती अधिकारामध्ये कागदपत्रांची छायांकित प्रत करणेकामी स्वतंत्र निधी नसल्याने लेखा शाखेकडून छायांकित प्रतीसाठी निधी उपलब्ध होत नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी म्हणून अर्जदार यांना छायांकित प्रती काढणेसाठी आवश्यक निधी अभावी वेळेत माहिती देता येत नाही.

यापुर्वीही मा. राज्य माहिती आयोग यांचेकडील अपील क्र.MHSICMU/२०१८/M/०४२८७, दि.३०.०१.२०१९ रोजीच्या आदेशात माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १९ (८) अन्वये आयोग राज्याचे मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव (वित्त) व अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन विभाग) यांना असे निर्देश देत आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत सर्व स्तरावरील जन माहिती अधिकाऱ्यांकडे पुरेशा अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करावी. अन्यथा त्यांना पी.एल.अे.खाते सुरु करण्याची परवानगी द्यावी जेणेकरुन शुल्कापोटी भरण्यात आलेली रक्कम त्या खात्यामध्ये जमा होऊन जन माहिती अधिकाऱ्यांना ही रक्कम अभिलेखाच्या प्रती काढण्याकरिता उपलब्ध होऊ शकेल असे आदेश करणेत आले आहेत.

परंतु, याबाबत कोणतीही निधी उपलब्ध झालेला नाही. तरी उपरोक्त नमूद खुलासा मान्य करुन जन माहिती अधिकारी यांचेवर कोणतीही शास्ती लागू नये हि विनंती."

३. या तक्रारीसंदर्भातील उपलब्ध कागदपत्र व विद्यमान / तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे लेखी अहवाल आणि तक्रारकर्ता यांचा युक्तीवाद ऐकून घेतल्यावर आयोगाच्या असे निदर्शनास आले की, तक्रारकर्ता यांनी सादर केलेल्या द्वितीय अपील क्र.४९३६/२०१८ संदर्भात आयोगाने दि.२८.०१.२०१९ अन्वये तक्रारकर्त्यास उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिले होते. सदर आदेशानुसार माहिती प्राप्त झाली नाही असे कारण नमूद करुन तक्रारकर्त्याने आयोगाकडे तक्रार सादर केली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने कोणताही अंतिम निर्णय घेण्यापुर्वी नैसर्गिक न्याय तत्वानुसार वेळोवेळी सुनावणीची संधी देवून सर्व संबंधित तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना आपले लेखी व मौखिक म्हणणे सादर करण्याची मुभा देण्यात आली. यामध्ये दि.२३.१२.२०२४ रोजी झालेल्या सुनावणीवेळी "जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलाशासह व त्यांचेवर प्रत्येकी रु. १०,०००/- दंड का लावण्यात येऊ नये याच्या खुलाशासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे." असे देखिल स्पष्ट निर्देश देण्यात आले होते.

वरील निर्देशानंतर देखिल दि.२७.०१.२०२५ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीस संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिले तसेच, त्यांनी कोणताही लेखी खुलासा सादर केला नाही.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता आयोग या निष्कर्षावर येत आहे की, या प्रकरणात द्वितीय अपीलाच्या अनुषंगाने दि.२८.०१.२०१९ च्या आदेशान्वये दिलेल्या निर्देशाचे श्रीमती एन.व्ही.गोपाळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार व श्री. हनुमंत जगताप, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अनुपालन केलेले नाही, हे स्पष्ट होते. सबब आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:

## आदेश

**१. आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ४९३६/२०१८, दि.२८.०१.२०१९ मध्ये दिलेल्या आदेशानुसार श्रीमती एन.व्ही.गोपाळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार व श्री. हनुमंत जगताप, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी, बोरिवली रुस्तमजी कॉम्पलेक्स, महानगरपालिका मंडई इमारत, जयवंत सावंत रोड, दहिसर (प) मुंबई - ६८ यांनी तक्रारकर्त्यास माहिती दिली नाही, तसेच दि.२३.१२.२०२४ च्या अंतरिम आदेशातील निर्देशानुसार कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ चे स्पष्टपणे उल्लंघन केलेले आहे.**

**त्यामुळे श्रीमती एन.व्ही.गोपाळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार व श्री. हनुमंत जगताप, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार या दोन्ही जन माहिती अधिका-यांवर माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये प्रत्येकी रु. १०,०००/- एवढी शास्ती करण्यात येत आहे.**

**सदरची शास्ती त्यांच्या मासिक वेतनातून दोन समान हप्त्यात वसूल करण्यात यावी व शासन परिपत्रक सा.प्र.वि. दि. ०९.०५.२००७ व शासन सा.प्र.वि. शुध्दिपत्रक दि.२८.०५.२००७ मध्ये नमूद केलेल्या पुढील लेखाशीर्षाखाली जमा करावी.**

**०७०-इतर प्रशासनिक सेवा**
**६० इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा**
**(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१).**

**२. शास्तीचा भरणा विहित मुदतीत करून उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बोरिवली यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ०३ महिन्यात आयोगास अनुपालन अहवाल सादर करावा.**

**३. या आदेशासह तक्रार अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

31-1-2025

**(डॉ.प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ३१.०१.२०२५**

**प्रत कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१. उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी, बोरिवली, रुस्तमजी कॉम्पलेक्स, महानगरपालिका मंडई इमारत, जयवंत सावंत रोड, दहिसर (प) मुंबई - ६८
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे जर विभागात कार्यरत नसतील तर ते सध्या ज्या विभागात / कार्यालयात कार्यरत आहेत त्या विभागाला व जन माहिती अधिकारी यांना विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश पाठविण्याची / बजविण्याची कार्यवाही करावी.